लागवड

# उन्हाळी भुईमुगाचं पीक ठरेल फायदेशीर

नारायण इंगळे
हर्षवर्धन मारकड
संजय रुपनर
महात्मा फुले कृषी विद्यापीठ,
पदव्युत्तर कृषी महाविद्यालय, राहुरी,
जि. अहमदनगर



भुईमूग हे द्विदल गटातील शेंगवर्गीय तेलबिया पीक आहे. वाढीच्या पद्धतीनुसार त्याचे उपट्या, निमपसऱ्या आणि पसऱ्या असे तीन प्रकार पडतात; तर वनस्पतीशास्त्रीयदृष्ट्या स्पॅनिश, व्हॅलेशिया आणि व्हॅर्जिनिया असे तीन वर्ग पडतात. स्पॅनिश व व्हॅलेशिया हे दोन्ही उपट्या वर्गात मोडतात, तर व्हॅर्जिनिया हे निमपसऱ्या व पसऱ्या वर्गात मोडतात. भुईमूग हे असे पीक आहे ज्यापासून सकस चारा, तेल, खाद्य (भाजके शेंगदाणे, चिक्की) तसेच सकस पेंड व टरफलांपासून उत्तम खत मिळते. उन्हाळी भुईमुगाची सुधारित पद्धतीने लागवड केल्यास उत्पादकता निश्चित वाढते.

भुईमूग हे तेलबिया पिकांमध्ये महत्त्वाचे पीक असून, हवामानाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेमुळे खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामात घेतले जाते. या तिन्ही हंगामांपैकी उन्हाळी भुईमुगाचे जास्त उत्पादन मिळते. भुईमूग हे द्विदल गटातील शेंगवर्गीय तेलबिया पीक आहे. वाढीच्या पद्धतीनुसार त्याचे उपट्या, निमपसऱ्या आणि पसऱ्या असे तीन प्रकार पडतात; तर वनस्पतीशास्त्रीयदृष्ट्या स्पॅनिश, व्हेलेशिया आणि व्हॅर्जिनिया असे तीन वर्ग पडतात. स्पॅनिश व व्हेलेशिया हे दोन्ही उपट्या वर्गात मोडतात, तर व्हॅर्जिनिया हे निमपसऱ्या व पसऱ्या वर्गात मोडतात. भुईमूग हे असे पीक आहे ज्यापासून सकस चारा, तेल, खाद्य (भाजके शेंगदाणे, चिक्की) तसेच सकस पेंड व टरफलांपासून उत्तम खत मिळते. उन्हाळी भुईमुगाची सुधारित पद्धतीने लागवड केल्यास उत्पादकता निश्चित वाढते.

**जमीन** : भुईमूग पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते हलकी, भुसभुशीत, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन योग्य असते. या जमिनी नेहमी भुसभुशीत राहत असल्याने जमिनीत भरपूर प्रमाणात हवा खेळती राहते. त्यामुळे मुळांची चांगली वाढ होऊन आऱ्या सुलभ रीतीने जमिनीत जाण्यास तसेच शेंगा पोसण्यासाठी मदत होते.

**हवामान** : भुईमूग हे पीक उष्ण व समशीतोष्ण कटिबंधातील आहे. भरपूर सूर्यप्रकाश व उबदार हवामान



पीकवाढीच्या दृष्टीने उपयुक्त असते.

**पूर्वमशागत** : पेरणीपूर्वी एका नांगरटीनंतर वखराच्या २-३ पाळ्या द्याव्यात. शेवटच्या पाळीअगोदर चांगले कुजलेले शेणखत ७.५ टन प्रतिहेक्टरी पसरवून जमीन भुसभुशीत करावी.

**पेरणी** : भुईमुगाच्या पेरणीसाठी रुंद सरी-वरंबा पद्धत फायदेशीर ठरते. या पद्धतीमध्ये 'बीबीएफ' यंत्राचा वापर करून ३० सें.मी. अंतरावर पेरणी करावी. एका बेडवर चार ओळी येतील, अशा रीतीने पेरणी करावी. यामुळे पिकास पाण्याचा ताण बसत नाही.

**पेरणीची वेळ** : उन्हाळी भुईमुगाची लागवड १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारीपर्यंत करावी. पेरणीच्या वेळी

| सुधारित जाती | पक्वतेचा कालावधी (दिवस) | सरासरी उत्पादन (क्विं/हे.) | प्रमुख वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| टी.ए.जी. -२४ | ११०-११५ | २५-३० | उपटी जात, संपूर्ण महाराष्ट्रासाठी |
| टी. जी.-२६ | ११०-११५ | २५-३० | उपटी जात, संपूर्ण महाराष्ट्रासाठी |
| आय.सी.जी.एस. -११ | १२५-१३० | २०-३० | उपटी जात, तेलाचे प्रमाण ४९ टक्के, सांगली, कोल्हापूरसाठी शिफारस |
| एस.बी.-११ | ११५-१२० | १५-२० | उपटी जात, तेलाचे प्रमाण ४८.२२ टक्के, संपूर्ण महाराष्ट्रासाठी |
| फुले उन्नती | १२०-१२५ | ३०-३५ | उपटी जात, संपूर्ण महाराष्ट्रासाठी |
| जे. एल.-५०१ | ११५-१२० | ३०-३५ | उपटी जात, संपूर्ण महाराष्ट्रासाठी |
| फुले भारती (जे.एल.-७७६) | ११५-१२० | २०-२५ | उपटी जात, उत्तर महाराष्ट्रासाठी |




किमान तापमान १८ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त असावे.

**बियाणे : भुईमुगाचे बियाणे वाढीच्या पद्धतीनुसार प्रतिहेक्टरी.**

**उपट्या - १००-१२० किलो, पसऱ्या व निमपसऱ्या- ८०-८५ किलो याप्रमाणे वापरावे.**

**सुधारित वाण** : उन्हाळी भुईमुगाचे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी लेखातील तक्त्यात दिलेले सुधारित वाण वापरावे.  या सुधारित जाती कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या आहे.

**बीजप्रक्रिया** : बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास थायरम ३ ग्रॅम व त्यानंतर २५ ग्रॅम प्रतिकिलो बियाण्यास रायझोबियम व स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धन चोळावे. बीजप्रक्रिया केलेले बियाणे सावलीत सुकून नंतर पेरावे.



**पेरणीचे अंतर** : ३० बाय १० सें.मी. (उपट्या), ४५ बाय १५ सें.मी. (पसऱ्या व निमपसऱ्या).

**खत व्यवस्थापन** : भुईमुग पिकासाठी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद प्रतिहेक्टरी लागते. संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी पेरून द्यावी. शेंगदाण्यातील अधिक तेलाचे प्रमाण वाढविण्यासाठी २० किलो गंधक द्यावे.

**आंतरमशागत** : भुईमुगाचे पीक तणविरहित ठेवण्यासाठी २ कोळपण्या व १ खुरपणी करावी. ३५ - ४०दिवसांनंतर आऱ्या सुटू लागल्यानंतर कोणतेही आंतरमशागतीचे काम करू नये. फक्त मोठे तण उपटून टाकावे म्हणजे शेंगा पोसण्याचे प्रमाण वाढेल.

**पाणी व्यवस्थापन** : भुईमुग पिकासाठी त्याच्या वाढीच्या अवस्थेनुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्या. उगवणीच्या वेळी (पेरणीनंतर लगेच), फुलोरा येणे (३० ते ४० दिवस), आऱ्या सोडण्याची अवस्था (४० ते ४५ दिवस) आणि शेंगा धरणे व दाणे भरणे (६५ ते ७० दिवस). आऱ्या जमिनीत जाण्याच्या वेळी तसेच शेंगा पोसण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण पडू देऊ नये.

**पीक संरक्षण** : टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास २५ ग्रॅम मॅन्कोझेब (डायथेन एम-४५) + २५ ग्रॅम बाविस्टीन १० ली. पाण्यात मिसळून फवारावे.

**काढणी व उत्पादन** : पीक तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात. शेंगांचे टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. अशा प्रकारे पीक तयार झाल्यावर काढणी करावी. वरील तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उन्हाळी भुईमुगाचे २५ ते ३० क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळू शकते. ■